**नांदगाव पंचायत समिती, नांदगांव, जिल्हा नाशिक या संस्थेचा सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल**

---

जा.क्र.स्था/३/ब/जिप/पंस नांदगांव/नाशिक/

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखाकोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवार,
नाशिकः-
दिनांकः-

**प्रेषक,**

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रति,**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

नांदगाव पंचायत समिती, नांदगांव, जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण श्री. र. ह. झगडे, निवडश्रेणी लिपीक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ५.७.२००८ ते ७.८.२००८ या कालावधीत पूर्ण केले. अहवालाचे पुनर्विलोकन श्री. सु. ध. ठाकरे, लेखा परीक्षा अधिकारी (प्रभारी), स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २१.८.२००८ रोजी केले. अंतिमीकरण श्री. वि.ए.कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ११.९.२००८ रोजी केले.

लेखा परिक्षीत आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

**सभापती**

| | |
|---|---|
| श्रीमती विजयाबाई विजय आहेर | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**गटविकास अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री. ए. पी. पिंगळे | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखापरीक्षण )

मागील लेखापरीक्षण अहवालातील खालील परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकुण परि. |
|---|---|---|---|
| १ | १९६३-६४ | १३ | १ |
| २ | १९७५-७६ | १४<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१४ः- जादा अनुदान देणे.(६.१०३) | १ |
| ३ | १९७९-८० | ३,१२<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.३ः- अल्पभुधारक अर्थसहाय्याने स्प्रेपंप पुरविणे.(६.००७) | २ |
| ४ | १९८६-८७-८८ | ५,१३<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१३ः- शेतकरी निवासस्थान भाडे वसुली नोंदवही. | २ |
| ५ | १९९२-९३ | ५<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.५ः- मागासवर्गीयांना पत्रे वाटपातील अनियमितता.(६.८१) | १ |
| ६ | १९९६-९७ | ३ | १ |
| ७ | १९९७-९८ | १८(१),१९(१), | २ |
| ८ | १९९८-९९ | १६(१,२) | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | १९९९-२००० | २३,२४<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२३ः- प्रलंबित अग्रीम रक्कमेबाबत.<br>परि.क्र.२४ः- अपुर्ण बांधकामाबाबत. | २ |
| १० | २०००-२००१ | ८,१२१९,३०<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.८ः- हातपंप विद्युतपंप वर्गणी वसुलीबाबत.(४.१८४)(९)<br>परि.क्र.१२ः- निवासस्थान भाडे कमी आकारणीबाबत. (४.१८७)(१२)<br>परि.क्र.३०ः- अपुर्ण बांधकामांबाबत. (४.१८२(२३) | ४ |
| ११ | २००१-२००२ | ३,४,१२,१६,२१,२६<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.३ः पंचायत समिती कार्यालय प्रवेशद्वार दुरुस्ती खर्चाबाबत (४.३०)<br>परि.क्र.४ः वाढीव उपकरातुन शेतक-यांना क्रेटसचा पुरवठा करणेबाबत (४.१२३)<br>परि.क्र.१२ः गहाळ पावती पुस्तकांबाबत (४.५ )<br>परि.क्र.२१ः जिप वाहन क्रमांक एमएक्सझेड चे अपघाताबाबत (४.८३)<br>परि.क्र.१६ः हातपंप/विदयुत पंप वर्गणी थकबाकीबाबत (४.२४९)(११)<br>परि.क्र.२६ : अपूर्ण बांधकामांबाबत (४.२४७)(८) | ६ |
| १२ | २००२-०३ | १३,१७<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१३ः- प्रलंबित अग्रिम रक्कमे बाबत.(४.२०४(८६))<br>परि.क्र.१७ः- ल.पा.उपविभाग नांदगांव : अपूर्ण जवाहर विहीरी (४.३९) | २ |
| १३ | २००४-०५ | ६<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.६ः- अपूर्ण जवाहर विहीरीबाबत (लघुपाटबंधारे) | १ |
| १४ | २००५-०६ | ४,७,८,९,१०,१४ | ६ |
| | **लेखा परीक्षण अहवाल सन २००६ – २००७** | | |
| परिच्छेद क्रमांक ३ः- पंचायत समिती सेसचे अंदाजपत्रकाबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ४ ः- पंचायत समिती सेसमधून समाजकल्याण विभागामार्फत १००% अनुदानावर शेतक-यांसाठी ताडपत्री खरेदीबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ५ः- पंचायत समिती सेसमधून महिला व बाल विकास विभागातर्फे नांदगांव प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रांना पॉलीस्टर कॉटन बस्करपटटया पुरविणेबाबत.(पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ६ ः- पंचायत समिती सेसमधून कृषि विभागातर्फे ५०% अनुदानाने शेतक-यांना | | | |

| |
|---|
| प्लास्टीक क्रेट्स वाटपाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ७ :- पंचायत समिती सेसअंतर्गत हिंगणे-देहरे ते पिंप्रिहवेली दरम्यान रस्ता दुरुस्तीबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ८ :- सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण नसतांना वेतनवाढी प्रदान केल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ९ :- सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण नसतांना वेतनवाढी दिल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १० :- कंत्राटी ग्रामसेवकांना अनामत रक्कमा परतावा केल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १२:- विशेष घटक योजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना अंतर्गत अपूर्ण विहीरीचे कामांबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १३:- अपूर्ण जवाहर विहीरीबाबत. (लघुपाटबंधारे) (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १४ :- हातपंप विजपंप वर्गणी थकबाकीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १५अ) :- ग्रामपंचायत विभागाकडील अफरातफर प्रकरणे व विस्तार अधिकारी यांचे दैनंदिनी व दप्तर तपासणी अहवालाबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १५(ब) :- संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनांतर्गत नेमलेल्या उपलेखापालाचे ग्रामपंचायत स्तरावर तपासणीचे उद्दीष्टपूर्तीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १६:- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले नाहीत. |
| परिच्छेद क्रमांक १७:- थकित अग्रिम रक्कमेबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १८:- संबंधितांना धनादेश बँकखाती न दिल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १९:- सेवापुस्तकातील नोंदी अपूर्ण असलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २० :- बांधकाम उपविभाग (इ.व द.) नोंदवहयाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २१:- लघुपाटबंधारे उपविभाग, नांदगांव यांचेकडील नोंदवही क्रमांक ४१ बाबत. |
| परिच्छेद क्रमांक २२:- तालुकामास्तर कार्यालयाने अनुदानाचे धनादेश बँकखाती न दिल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २३:- धनादेश रदद न केल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २४ :- ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा केल्याबाबत. |

**टिप :-** उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायांमध्ये नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतिम समजणेत यावेत.

## भाग दुसरा
## चालु लेखा परीक्षण

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (अ) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ३:- पंचायत समिती उपकराचे अंदाजपत्रकाबाबत.**

पंचायत समिती, नांदगावच्या सन २००७ – २००८ चे सुधारीत अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्र. १८ दि. २४.०१.२००८ अन्वये मंजूर केले आहे. त्यामध्ये प्रत्येक शिर्षाखाली केलेल्या तरतुदीचा व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

आकडे रुपयांत

| अ. क्र. | शिर्षक | तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३ शिक्षण | १०,००० | -- | १०,००० | -- |
| २ | ४ बांधकाम इ व द | -- | -- | -- | -- |
| ३ | ५ लघुपाटबंधारे | -- | -- | -- | -- |
| ४ | ८ सार्वजनिक आरोग्य (टीसीएल पावडर खरेदी) | ११,००० | -- | ११,००० | -- |
| ५ | ११ शेती (शेतक-यांना ताडपत्री खरेदी) | १,११,५८२ | १,३१,६८९ | - | २०,१०७ |
| ६ | १२ पशुसंवर्धन | -- | -- | -- | -- |
| ७ | १४ समाज कल्याण | ६५,००० | ६३,८२८ | १,१७२ | -- |
| ८ | २० संकीर्ण महिला व बालकल्याण (१०%)(बस्करपटया खरेदी) | २५,००० | -- | २५,००० | -- |
| | **एकूण :-** | २,०२,५८२ | १,९५,५१७ | ४७,१७२ | २०,१०७ |

सन २००७ – २००८ साठी सुधारीत तरतूद २,०२,५८२/- करण्यात आलेली होती. मात्र प्रत्यक्षात खालीलप्रमाणे रक्कमा प्राप्त झालेल्या आहेत. सन २००७ – २००८ ची सुरवातीची शिल्लक रुपये १६,३१५/- व चालू आर्थिक वर्षात प्राप्त झालेले अनुदान व इतर जमा रुपये १,८८,००५/- असे एकूण रुपये २,०४,३२०/- जमा दिसून येतात, मात्र एकूण खर्च रुपये १,९५,५१७/- झालेला आहे.

उपलब्ध तरतूद व प्रत्यक्ष खर्च यांवर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) सन २००७ – २००८ च्या मुळ अंदाजपत्रकात सर्व बाबींवर खर्च करण्यासाठी वरीलप्रमाणे तरतूद करण्यांत आलेली होती. मात्र, सन २००७ – २००८ च्या आर्थिक वर्षाअखेर इतर बाबींवरील तरतूद वर्ग करुन रस्ते दुरुस्ती व ताडपत्री खरेदीवरच जास्तीत जास्त खर्च करण्यांत आलेला आहे.

२)  मा. जिल्हाधिकारी, नाशिक व तहसिलदार, नांदगाव यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून दिनांक ३१.३.२००८ अखेर किती उपकर वसूल झाला, याचा तपशिल उपलब्ध करुन पंचायत समिती उपकराच्या सर्व रकमा प्राप्त झाल्याची खात्री करावी.

३)  १४ समाजकल्याण लेखाशिर्षाखाली रक्कम रुपये १,१७२/- कमी खर्च केलेला आहे. ही रक्कम पुढील अंदाजपत्रकात अनुशेष धरुन अनुपालन दाखवावे.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यांत यावे.

लेखाशिर्ष,<br>पंचायत समिती सेस<br>पंचायत समिती, नांदगांव

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- ५० टक्के अनुदानावर सौरकंदिल पुरवठा करणेबाबत.**

प्रशासकीय मंजुरी : पं.स. सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ४, दिनांक २४.१.२००८

तांत्रिक मंजुरी : ग.वि.अ. यांचे पत्र क्रमांक २४४ दिनांक १३.३.२००८

अदा रकमेचा तपशिल : प्रमाणक क्र. २ दि. ३१.१.२००८ अन्वये रक्कम रु. ४९,६४४ ची एकूण २८ नग, जैन सिस्टीम प्रा. लि. जळगाव यांचेकडून खरेदी.

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१)  महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी यांचे दरकराराचे पत्र क्रमांक असएन/एसपीव्ही/५७/०६/५६१८ दिनांक १३.९.२००६ मध्ये नमुद केल्यानुसार कंपनीने लाभार्थ्यासोबत ५ वर्षाचा सर्वकष देखभाल दुरुस्तीबाबत करारनामा करणे आवश्यक आहे. (कॉम्प्रेसिव्ह मेनटेनन्स कॉन्ट्रक्ट) याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे भविष्यात सौरकंदील नादुरुस्त झाल्यास त्याची उपयोगिता संपुष्टात येऊन योजनेचा उद्देश सफल होणार नाही. तरी दरकरारानुसार कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांत दाखविण्यांत यावा.

२)  सदर योजनेचे तांत्रिक मंजुरीनुसार सौरकंदीलांचे वाटप सन २००७ – २००८ वर्षात करणे आवश्यक असतांना ते साठा नोंदवहीनुसार २००८ – २००९ वर्षात केलेले आहे. तांत्रिक मंजुरीचे अटी व शर्तीनुसार लाभार्थ्यांना सन २००७-०८ या वित्तीय वर्षात लाभ मिळालेला नाही. सदर अनियमिततेतील सक्षम अधिकारी यांचे क्षमापन आदेश प्राप्त करण्यात यावे.

३)  सौर कंदिल वाटपाचे विनियोग दाखले प्राप्त करुन अनुपालन दाखवावे.

४)  लेखापरीक्षण कालावधीअखेर एकूण ४ नग सौर कंदिल शिल्लक असून त्याचे वाटप करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखविण्यात यावे.

५)	उपरोक्त नमुद सौर कंदिल हे महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सीचे दरकरार पत्र क्रमांक आयएन/एसपीव्ही ५७/०६/५८१८ दिनांक १३.९.२००६ नुसार खरेदी करण्यात आलेले आहेत. त्यात नमुद अटी व शर्तीनुसार साहित्य मिळाल्यावर ७० टक्के रक्कम अदा करणे आवश्यक आहे व उर्वरीत ३० टक्के रक्कम ही सौर कंदिल व्यवस्थित सुरु असल्याची खात्री केल्यानंतर अदा करणे आवश्यक होते. तथापी पंचायत समितीने १०० टक्के रक्कम अदा केलेली आहे. सदरची बाब ही अनियमित असून सौर कंदिल व्यवस्थित सुरु असल्याची व सुस्थितीत प्राप्त झालेली असल्याची खात्री केल्यानंतरच उर्वरीत ३० टक्के रक्कम देणे आवश्यक होते. तरी सदर अनियमिततेस संबंधीत सक्षम अधिकारी यांचे क्षमापन घेण्यात यावे.

उपरोक्त नमुद आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखविण्यात यावे. तोपावेतो रक्कम रुपये ४९,६४४ आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
१२ कृषि विभाग
पं.स.सेस अनुदान
आक्षेपाधीन रक्कम रुपये ४९,६४४/-

---

**<u>परिच्छेद क्रमांक ५</u> :- <u>१०० टक्के अनुदानावर सौर कंदिल खरेदीबाबत.</u>**

प्रशासकीय मंजुरी : दिनांक २४.१.२००८ चे सर्वसाधारण सभेनुसार
तांत्रिक मंजुरी : ग.वि.अ. यांचे पत्र क्रमांक १६८ दिनांक १३.२.२००८
खर्चाचा तपशिल : प्रमाणक क्र. १ दिनांक ३१.३.२००८ जैन सिस्टीम प्रा.लि. जळगाव यांना रुपये ६३,८२८/- अदा (१८ नग)

सदरचे खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१)	उपरोक्त नमुद सौर कंदिल हे महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सीचे दरकरार पत्र क्रमांक आयएन/एसपीव्ही ५७/०६/५८१८ दिनांक १३.९.२००६ नुसार खरेदी करण्यात आलेले आहेत. त्यात नमुद अटी व शर्तीनुसार साहित्य मिळाल्यावर ७० टक्के रक्कम अदा करणे आवश्यक आहे व उर्वरीत ३० टक्के रक्कम ही सौर कंदिल व्यवस्थित सुरु असल्याची खात्री केल्यानंतर अदा करणे आवश्यक होते. तथापी पंचायत समितीने १०० टक्के रक्कम अदा केलेली आहे. सदरची बाब ही अनियमित असून सौर कंदिल व्यवस्थित सुरु असल्याची व सुस्थितीत प्राप्त झालेली असल्याची खात्री केल्यानंतरच उर्वरीत ३० टक्के रक्कम देणे

आवश्यक होते. तरी सदर अनियमिततेस संबंधीत सक्षम अधिकारी यांचे क्षमापन घेण्यात यावे.

२) सौर कंदिल सुस्थितीत व व्यवस्थित सुरु असल्याची तपासणी व उपयोगिता प्रमाणपत्रे तपासणीस उपलब्ध करण्यात आली नाहीत. सदरची प्रमाणपत्रे तपासणीस उपलब्ध करण्यात यावीत.

३) उपरोक्त नमुद दरकरारानुसार कंपनीने लाभार्थ्यांसोबत ५ वर्षाचा सेवा व दुरुस्तीबाबत करारनामा करणे आवश्यक आहे. (कॉम्प्रेसिव्ह मेनटेनन्स कॉन्ट्रक्ट) परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्याने योजनेचा उद्देश सफल होत नाही. भविष्यात सौर कंदील नादुरुस्त झाल्यास त्याची उपयोगिता संपुष्टात येईल. तरी दरकरारानुसार पूर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणांत दाखविण्यांत यावे.

उपरोक्त नमुद आक्षेपांची पूर्तता करण्यात यावी. तोपावेतो खर्च रक्कम रुपये ६३,८२८/- लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
समाजकल्याण
पंचायत समिती सेस अनुदान
आक्षेपाधीन रक्कम रुपये ६३,८२८/-

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ब) खालील अनियमितता.

**परिच्छेद क्रमांक ६ :- कर्तव्यस्थानी दिलेल्या निवासस्थानासाठी अनुज्ञप्ती शुल्काची वसूली न केल्याबाबत.**

पंचायत समिती, नांदगाव येथील सन २००७ - २००८ चे लेखापरीक्षणामध्ये अनुज्ञप्ती शुल्क वसूली नोंदवहीची पडताळणी केली असता श्री. ए. बी. पिंगळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव यांच्याकडे दिनांक १.११.२००३ पासून दिनांक ३१.५.२००८ पर्यंत प्रतिमाह रुपये ३५०/- प्रमाणे ५६ महिन्यांचे अनुज्ञप्ती शुल्क रक्कम रुपये १९,६००/- थकबाकी येणे असल्याचे स्पष्ट झाले.

शासन निर्णय, क्रमांक घभाव २०००/प्र.क्र.९७/२०००/सेवा २५/दिनांक १७.२.२००१ तसेच मुंबई नागरी सेवा नियम १९५९ खंड - १ मधील नियम ८४९ (बी) च्या तरतुदीनुसार वित्तलब्धीच्या १०% किंवा निवासस्थानाचे प्रमाणित भाडे यांपैकी जे कमी असेल तेवढे अनुज्ञप्ती शुल्क द्यावे लागेल, अशी तरतुद असतांनाही सदरची रक्कम प्रतिमाह वेतनातून कपात करण्यात आलेली नाही. थकीत येणे रक्कम रुपये १९,६००/- त्वरीत वसूल

करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करावे व तसे अनुपालन लेखापरीक्षणात सादर करावे.

वसुलपात्र रक्कम रुपये १९,६००/-
पंचायत समिती नांदगाव

---

**परिच्छेद क्रमांक ७ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याबाबत.**

पंचायत समिती, नांदगाव या कार्यालयाची जीप क्रमांक एम एच १५, अेअे – ५०७० ची सन २००७-०८ ची वाहननिशी तपासली असता या अहवालासोबत जोडण्यात आलेले परिशिष्ट क्रमांक १ नुसार वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याचे स्पष्ट होते.

शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक जेईपी/२४६९/१७७०३/डी-१ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करणेपूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असतांना वरील प्रकरणी तशी मंजूरी घेण्यात आलेली नाही. सबब या प्रकरणी शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक प्रवास १००५/प्र.क्र.३३/सेवा-५ दिनांक ८.७.२००५ अन्वये दर रुपये ८/- प्रति किमी. प्रमाणे ३५५४ किलोमीटर प्रवासाची रक्कम रुपये २८,४३२/- संबंधितांकडुन वसूल करुन अनुपालन लेखा परीक्षणांस दाखवावे.

वसुलपात्र रुपये २८,४३२/-

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (क) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ८ :- थकित अग्रिम रक्कमेबाबत.**

या अहवालासोबत जोडण्यांत आलेल्या विवरणपत्र क्रमांक ३(अ) नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर कार्यालयीन कर्मचारी / प्राथमिक शिक्षक यांचेकडे उत्सव, धान्य, प्रवास भत्ता, वेतन, पेट्रोल-डिझेल, पाणीपुरवठा इत्यादी प्रकारच्या अग्रीमाची रक्कम रुपये ३,८६,५०४/- सन १९८३-८४ पासुन थकीत असल्याचे दिसून येते.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.लेपअ/१०९२/ प्र.क्र.१४६९ /३० दिनांक २६.२.१९९३ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार गटविकास अधिकारी यांनी ठोस कार्यवाही करुन रक्कम रुपये ३,८६,५०४/- वसुल करणेची उपाय योजना व कार्यवाही करावी आणि तसे अनुपालन लेखापरीक्षणात दाखवावे.

देण्यात आलेल्या अग्रिम रक्कमेची वसुली / समायोजन वेळीच होणे आवश्यक आहे. अग्रीम रक्कमांची वसुली वेळीच न झाल्यास जबाबदार असणारे अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द उचित कारवाई करुन त्यांचेकडून ही रक्कम वसुल करावी.

---

## <u>मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड) खालील अनियमितता.</u>

---

### <u>परिच्छेद क्रमांक ९ :- संपूर्ण ग्रामिण रोजगार योजनेतून धान्य वाटप कुपनांबाबत व दप्तर तपासणीबाबत.</u>

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना नाशिक जिल्हयात सन २००२ – २००३ ते सन २००७ – २००८ या पाच वर्षात राबविण्यात आली. या योजनेत रोख मजूरीसह धान्य वाटपही समाविष्ट आहे. सन २००७ – २००८ वर्षाअखेर पंचायत समिती नांदगाव अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर वाटप केलेले धान्य कुपन व ग्रामपंचायतीने झालेल्या खर्चाचे प्रमाणात वाटप मजुरी व धान्य कुपने यांचा उपलब्ध हिशोब सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक २ नुसार नमुद आहे. तथापि उर्वरित वाटपाचा हिशोब ग्रामपंचायतीकडून प्रलंबित असल्याचा खुलासा करण्यात आला आहे.

उपलेखापाल (संग्रारोयो) यांनी ग्रामपंचायतींकडील (संग्रारोयो) दप्तराची नियमित तपासणी न करणे ही गंभिर बाब असून पर्यवेक्षणाचा अभाव दर्शविणारी आहे व उपलेखापालाचे कामकाजावर पर्यवेक्षकीय नियंत्रण नसल्याचे स्पष्ट होते. तरी उपलेखापाल यांनी ग्रामपंचायत दप्तराची तपासणी करुन खर्चाचे प्रमाणात वाटप धान्य कुपन व मजुरी यांचा मेळ घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे. धान्य कुपनामध्ये रक्कम रुपये १३,६३,५४०/- गुंतलेली असल्याने ताळमेळ घेणेचे काम प्राधान्य क्रमाने पूर्ण करण्यात यावे.

---

### <u>परिच्छेद क्रमांक १० :- रिक्त / नादुरुस्त निवासस्थानाबाबत.</u>

पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राकडील कर्मचारी, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी व इतर आदिंच्या रिक्त / नादुरुस्त निवासस्थानांबाबत अर्धसमासिय पत्र क्रमांक १२ दिनांक १७.७.२००८ अन्वये मागविण्यात आलेल्या माहितीनुसार खालील

निवासस्थाने रिक्त / नादुरुस्त असल्याचे गटविकास अधिकारी, पंचायत समिती नांदगाव यांनी उत्तरादाखल नमुद केलेले आहे.

| अ.क्र. | तपशिल | निवासस्थान संख्या | रिक्त असण्याची कारणे |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसेवक, बोलठाण | १ | नादुरुस्त |
| २ | ग्रामसेवक, न्यायडोंगरी | १ | नादुरुस्त |
| ३ | शिक्षक, बोलठाण | १ | नादुरुस्त |
| ४ | पशुसंवर्धन विभाग | ३ | नादुरुस्त |
| ५ | पशुसंवर्धन विभाग | १ | २००६ पासून रिक्त |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेतः

१) दिर्घकालापासून नादुरुस्त निवासस्थाने त्वरीत दुरुस्त करणेबाबत कार्यवाही व्हावी. जेणेकरुन शासनाचे वेतन बिलातून देण्यात येणारे घरभाडे खर्चामध्ये बचत होऊ शकते, तसेच कर्मचारी मुख्यालयी राहतात.

२) क्रमांक ५ चे निवासस्थान २००६ पासून रिक्त असल्याची कारणे नमुद केलेली नाहीत. त्यामुळे निवासस्थान रिक्त ठेवण्याचे प्रयोजन समजून येत नाही. तरी ज्या कर्मचारी / अधिका-यांसाठी ते बांधण्यात आले आहे ते इतरत्र राहत असल्यास व घरभाडे घेत असल्यासा रिक्त असणा-या संपूर्ण कालावधीसाठी प्रदान घरभाडयाची रक्कम व अनुज्ञप्ती शफल्काची रक्कम जबाबदारी निश्चित करुन वसूल करावी व अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ११ :- ग्रामपंचायतीच्या गौण घटकांच्या लेखापरीक्षणाबाबत.</u>**

सन २००७ – २००८ या आर्थिक वर्षामध्ये विस्तार अधिकारी (ग्रापं), पंचायत समिती, नांदगाव यांना किती गौण ग्रामपंचायतींच्या लेखापरीक्षणाचे लक्षांक देण्यांत आले होते, त्यानुसार किती पूर्ण केले, किती बाकी आहेत व किती ग्रामपंचायतीचे अहवाल निर्गमित करण्यांत आले; इत्यादी माहिती अर्धसमासिय पत्र क्रमांक ३ दिनांक १७.७.२००८ अन्वये मागविण्यांत आली होती. त्यानुसार गटविकास अधिकारी यांनी सादर केलेल्या उत्तरावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) गटविकास अधिकारी, पंचायत समिती नांदगाव यांनी दिलेल्या माहितीनुसार एकूण १९ गौण ग्रामपंचायतीचे सन २००७ – २००८ वर्षात लेखापरीक्षणाचे लक्षांक दिलेले असतांना एकही गौण ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण करण्यांत आलेले नाही. सदरची बाब ही गंभीर स्वरुपाची असून वेळीच गौण ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण न झाल्यास ग्रामपंचायत

स्तरावरील गंभीर अनियमितता / अपहार असल्यास त्याकडे दुर्लक्ष होऊन त्यावर वेळीच कार्यवाही होण्याऐवजी पुढील होणारा गैरव्यवहार / अपहार यात वाढ होऊन यावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही. याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी. तसेच सदरच्या अनियमिततेस मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन आदेश प्राप्त करुन अनुपालन दाखविण्यांत यावे.

२) नांदगाव तालुक्यातील सर्व गौण ग्रामपंचायतींचे थकीत घटकासह लेखापरीक्षण करुन घेणेसाठी नियोजनबध्द कार्यवाही करणेबाबत लेखापरीक्षणांत सूचित करण्यांत येत आहे.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- ग्रामपंचायतींच्या दप्तर तपासणीबाबत.**

सन २००७ – २००८ वर्षात किती दप्तर तपासणीचे लक्षांक देण्यांत आले व प्रत्यक्षात किती पूर्ण करण्यांत आले याबाबत अर्धसमासिय पत्र क्रमांक १९ दिनांक ११.९.२००८ अन्वये मागविण्यांत आलेल्या माहितीनुसार खालीलप्रमाणे दप्तर तपासणीचे लक्षांक संबंधित अधिकारी यांनी कमी केलेले असल्याचे आढळून आले.

| अ. क्र. | अधिका-यांचे नाव | हुद्दा | दप्तर तपासणीचे दिलेले वार्षिक लक्षांक | प्रत्यक्ष केलेली तपासणी | कमी केलेले लक्षांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. ए. पी. पिंगळे | गटविकास अधिकारी | २४ | २० | ४ |
| २ | श्री. एस. आर. हिरे | कनिष्ठ लेखाधिकारी (संग्रारोयो) | ६० | निरंक | ६० |
| ३ | श्री. एस. डी. महाले | ग्रा.पं.विस्तार अधिकारी | १२० | ६१ | ५९ |
| ४ | श्री. एस.एस. महाले | ग्रा.पं.विस्तार अधिकारी | १२० | ८७ | ३३ |

उपरोक्त नमुद काही अधिका-यांनी त्यांना दिलेले दप्तर तपासणीचे उद्दिष्ट पूर्ण केलेले नाही. सदरची बाब ही गंभीर स्वरुपाची असून, दप्तर तपासणीकडे केलेल्या दुर्लक्षामुळे ग्रामपंचायतींवरील प्रशासकीय नियंत्रणामध्ये शिथिलता येऊन, संभाव्य गैरव्यवहारावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही. वरीलप्रमाणे कमी लक्षांकाबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन मिळवून अनुपालन लेखापरीक्षणांत दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- तालुका मास्तर यांचेकडील रोखवहीतील अनियमितता**

सन २००७ – २००८ वर्षासाठी तालुका मास्तर यांचेकडील रोखवहीची पडताळणी केली असता त्यात खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

१) दिनांक १.४.२००७ ते २९.६.२००७ पर्यंतचे सुरुवातीची शिल्लक तथा एकूण एकंदर (जमा बाजू) व खर्च बाजूकडील एकूण खर्च, अखेर शिल्लक व एकूण एकंदर रक्कमा या पेन्सिलीने लिहिलेल्या आहेत त्या पक्या शाईने लिहिणे आवश्यक असतांना कच्चे शिल्लका नमुद करणे अनियमित आहे.

२) रोखवहीतील ब-याच शिल्लक रक्कमांच्या नोंदी ह्या व्हाईटनर लावून खोडण्यांत आलेल्या आहेत. (दिनांक ४.७.२००७ ते २४.१०.२००७ पर्यंतचे व्यवहार) व्हाईटनर लावून व्यवहार खोडणे संशयास्पद असून सदरबाबत संबंधित जबाबदार अधिकारी यांनी पडताळणी करुन गैरव्यवहार झालेला नसल्याचे प्रमाणित करावे.

३) दिनांक जूलै २००७ अखेर बँक मेळपत्रकाचे तपशिलामध्ये बँक शिल्लका नमुद केलेल्या नाहीत. त्या नमुद करण्यांत याव्यात.

४) रोखवहीत ब-याच ठिकाणी गटशिक्षण अधिकारी / तालुका मास्तर यांच्या स्वाक्ष-या नसल्याचे आढळून आले. उदाहरणार्थ दिनांक २.४.२००७, ४.५.२००७ ते २३.५.२००७, १.६.२००७ ते ५.६.२००७, १८.६.२००७ ते २९.६.२००७, १.११.२००७, २.११.२००७, १४.११.२००७, १०.१२.२००७, १९.१२.२००७, ३.१.२००८, १४.१.२००८, १५.२.२००८ ते २०.२.२००८, १.३.२००८ ते १७.३.२००८, २४.३.२००८ या दिवसांच्या सर्व व्यवहारांवर तालुका मास्तर व गटशिक्षण अधिकारी यांच्या सह्या नाहीत. सदरची बाब ही गंभीर स्वरुपाची असून सदर अनियमिततेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेण्यांत यावे व सदरच्या व्यवहारामध्ये गैरव्यवहार झालेला नसल्याची अंतर्गत लेखापरीक्षक यांनी खात्री करुन तसे प्रमाणित करण्यांत यावे.

५) सन २००७ – २००८ वर्षामध्ये महिन्या अखेरीस खालीलप्रमाणे शिल्लक रक्कमा आहेत.

| **महिना** | **महिना अखेर शिल्लक रक्कम (रु)** |
|---|---:|
| एप्रिल २००७ | ५,९१,६४० |
| मे २००७ | ८,६८,५४२ |
| जून २००७ | ३,६६,८२३ |
| जूलै २००७ | ७,९२,१६७ |
| ऑगस्ट २००७ | ११,८९,१४१ |
| सप्टेंबर २००७ | ७,२४,३३४ |
| ऑक्टोंबर २००७ | ७,४०,७६६ |
| नोव्हेंबर २००७ | ४,८७,२६७ |

| | |
|---|---|
| डिसेंबर २००७ | ५,३७,२३५ |
| जानेवारी २००८ | ५,८७,३६२ |
| फेब्रुवारी २००८ | ५,१८,९२१ |

अ) या शिल्लक रक्कमा कधीपासून, कोणाच्या व किती बाकी आहेत याचा गोषवारा काढण्यांत आलेला नाही. प्रत्येक महिनाअखेर शिल्लक रक्कमांची पडताळणी करता आली नाही. सदरबाबत संबंधित तालुकामास्तर यांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी व गोषवारे काढून शिल्लक रक्कमा त्वरीत संबंधित विभागाकडे परत पाठविण्यांत याव्यात.

ब) तालुका मास्तर हे केवळ संवितरण अधिकारी असल्याने त्यांचेकडे मोठया प्रमाणावर शिल्लक रक्कमां राहण्याचे प्रयोजनच नाही. संबंधित मुख्याध्यापक, शाळा, कर्मचारी जर वेळीच रक्कमां घेऊन जात नसतील, तर सदरची बाब ही वरिष्ठांचे निर्दशनास आणणे आवश्यक होते. तथापि याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. सदर बाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी.

६) तालुका मास्तर यांनी खालीलप्रमाणे त्यांचे स्वाक्षरीने शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा केलेला असल्याचे आढळून आले.

| अ. क्र. | दिनांक | रक्कम (रुपये) | भरणा लेखाशिर्ष | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | १२.१०.२००७ | ३९,२४६ | ०२०२००८२ सर्वसाधारण खर्च न झालेल्या रक्कमा | दारिद्रय रेषेखालील मागास मुलींचा उपस्थिती भत्ता<br>०५ – ०६ २२,७८४<br>०६ – ०७ ३९,२४६ |
| २ | २४.१०.२००७ | ६,०९१ | ०२०२००८२ सर्वसाधारण खर्च न झालेल्या रक्कम | ०५ – ०६ १,१५० गणवेश<br>०६ – ०७ ९५८ गणवेश<br>०१ – ०५ ३,९८३ उपस्थिती भत्ता |

तालुका मास्तर हे केवळ संवितरण अधिकारी असल्याने त्यांनी ज्यांचेकडून रक्कमा प्राप्त झाल्यात त्यांचेकडे परत करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे त्यांचे स्वाक्षरीने परस्पर शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा केल्याने सदरच्या रक्कमां ह्या पंचायत समिती व पर्यायाने जिल्हा परिषद वार्षिक लेख्यांत समावेश न झाल्याने सदरची रक्कम लेख्याबाहेर राहते. तरी सदर बाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी.

उपरोक्त नमुद भरणा रक्कमांचा कालावधी पहाता त्या सन २००४ – २००५ पासूनच्या विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक लाभाच्या असून, दिर्घकाल शिल्लक आहेत. रक्कमांचे संवितरण न करता लाभार्थ्यांना लाभापासून वंचित ठेऊन विलंबाने अनुदान निधी परत

केल्याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी, व उचित प्रशासकीय कारवाई व्हावी.

वरील आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षाणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक १४ :- ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा केलेबाबत.**

पंचायत समिती नांदगाव येथील सन २००७ – २००८ वर्षात सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक ३ नुसार विषयांकीत दैनंदिन्या प्राप्त झालेल्या नसल्याचे नोंदवहीवरुन स्पष्ट होते.

ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा करणेबाबत संबंधिताची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. अदा केलेल्या संपूर्ण कालावधीत हे सर्व कर्मचारी व अधिकारी विहित कर्तव्यासाठी कार्यरत असल्याचे व त्यांनी विहीत इष्टांकपूर्ती केल्याचे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले नाहीत.**

पंचायत समिती, नांदगावचे सन २००७ – २००८ कालावधीतील खालील कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले घेणेत आलेले नाहीत.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. एस. पी. कासार | कृषि अधिकारी |
| २ | श्री. व्ही. ए. चौधरी | कृषि अधिकारी |
| ३ | श्री. एस. डी. महाले | विस्तार अधिकारी (ग्रा.पं) |
| ४ | श्री. व्ही. ए. सोनवणे | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) |
| ५ | श्री. एन. एस. भागवत | पशुधन पर्यवेक्षक |
| ६ | श्री. एन. एस. माहुरे | पर्यवेक्षक |
| ७ | श्री. आर. टी. आढळकर | ग्रामसेवक |
| ८ | श्री. बी. डी. साळुंखे | ग्रामसेवक |
| ९ | श्री. ए. एस. मवाळ | ग्रामसेवक |
| १० | श्री. बी. बी. सरोदे | ग्रामसेवक |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. सी. के. मुंढे | ग्रामसेवक |
| १२ | श्री. एच. बी. गुंजाळ | ग्रामसेवक |
| १३ | श्री. आर. के. जाधव | क.सहा. (प्रा.आ.केंद्र, वेहेळगाव) |
| १४ | श्री. डी. ए. पाटील | क.सहा. (प्रा.आ.केंद्र, न्यायडोंगरी) |
| १५ | श्री. अे. अे. खैरनार | वाहन चालक |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४३(३) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षाचे सुरुवातीस जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणेत आलेले नाहीत.

तरी उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- लिहिलेले धनादेश प्रदान न केलेबाबत.**

सोबतचे परिशिष्ट क्रमांक ४ नुसार पंचायत समितीकडील जिल्हानिधी, अभिकरण, जिल्हापरिषद उपकराच्या सन २००७ – २००८ मधील रोखवही व धनादेश पुस्तक यांची पडताळणी केली असता खालील दर्शविलेले धनादेश अद्यापपर्यंत संबंधितांना प्रदान करणेत आलेले नाहीत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम २७ अन्वये लागलीच आवश्यकता असलेशिवाय खर्च करण्यास अनुमती नाही. असे असतांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी केवळ त्या-त्या लेखाशिर्षाखालील अनुदान व्यपगत होऊ नये म्हणुन आवश्यकता नसतांनाच दिर्घदिन खर्च नोंदविलेला आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १७ :- स्टेशनरी साठा नोंदवहीबाबत.**

पंचायत समिती, नांदगाव सन २००७ – २००८ मधील स्टेशनरी नोंदवहीची पडताळणी केली असता, नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आली असून खरेदी साहित्याची नोंदही केलेली आहे. मात्र वाटप करावयाचे स्तंभांमध्ये फक्त कार्यालयीन वापरासाठी असा शेरा मारुन गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

सदरच्या नोंदवहीवरुन खरेदी केलेल्या साहित्याचे पुर्ण वाटप झाले किंवा कसे, तसेच शिल्लक साहित्य, साहित्य प्राप्तकर्त्याची स्वाक्षरी याबाबत कोणतीही खात्री होत नसल्याने विहित नमुन्यातील नोंदवही ठेवण्यामागील उद्देश सफल होत नाही. त्यातूनच खरेदी केलेल्या साहित्याचा गैरवापर होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे केलेल्या अपूर्ण नोंदींबाबत तपशिल नमुद करुन पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १८ :- विनावापर पडून असलेली यंत्रसामुग्रीबाबत.**

अर्धसमास पत्र क्रमांक ६ दिनांक १७.७.२००८ नुसार विनावापर पडून असलेल्या यंत्रसामुग्रीबाबतची माहिती उपविभाग (इ व द) येवला यांनी सादर केल्यानुसार त्यांचेकडे रोडरोलर क्रमांक एम.एक्स.झेड. ८२१००४३३ दिनांक १२.२.१९९४ पासून व रोडरोलर क्रमांक डी.आर.आर. ११२७ दिनांक १.४.१९९६ पासून नादुरुस्त असून त्यांची दुरुस्ती किफायतशीर नसल्याचे नमुद केले आहे.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवा योजना विभाग, शासन निर्णय क्रमांक आयटीआय/३०९४/४०७४/व्यशि-१ दिनांक ४.२.१९९५ नुसार कार्यालयात ज्या नियमित वापराच्या दृष्टीने अयोग्य अशा यंत्रसामुग्री / वस्तु निर्लेखित केल्या जातात. त्या लिलावाद्वारे विकून टाकण्याऐवजी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षक तंत्रनिकेतन, तत्र माध्यमिक शाळा, अभियांत्रिकी महाविद्यालये यांना त्यांचे कडील विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी सदर शासन निर्णयात नमुद कार्यपध्दतीचा अवलंब करुन कोणतेही मुल्य न आकारता हस्तांतरीत कराव्यात असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

उपअभियंता (ल.पा.) उपविभाग यांचेकडील उपरोक्त विनावापर पडून असलेले रोड रोलर हे दुरुस्ती योग्य नसल्याने उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार अभियांत्रिकी संस्थांना शासन निर्णयात नमुद कार्यपध्दतीनुसार हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- बाहयरुग्ण फी उशिरा भरणा केलेबाबत.**

पंचायत समिती, नांदगावकडील प्राथमिक आरोग्य केंद्र, वेहेळगावकडील सन २००७-०८ रोकडवहीची तपासणी केली असता बाहय रुग्ण फी खालीलप्रमाणे विलंबाने भरणा केल्याचे स्पष्ट झाले.

| बाहयरुग्ण फी जमा केल्याचा कालावधी | रक्कम (रु.) | भरणा केलेला दिनांक |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| २०.०२.२००७ ते २६.०४.२००७ | ६६८ | ०३.०५.२००७ |
| १२.०६.२००७ ते ३०.०७.२००७ | ७५६ | ०६.०८.२००७ |
| ३१.०७.२००७ ते २०.०९.२००७ | ६०० | २७.०९.२००७ |
| १५.१०.२००७ ते १७.११.२००७ | ३३४ | २२.११.२००७ |
| ०६.१२.२००७ ते १३.०१.२००८ | ३६० | ०४.०२.२००८ |
| १७.०१.२००७ ते १५.०४.२००८ | १,५६० | २८.०४.२००८ |

महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहीता, १९६८ चे नियम १३ अन्वये वसुल केलेली रक्कम दररोज जमा करणे आवश्यक आहे. नियम क्रमांक ४९ अन्वये उशिरात उशिरा १५ दिवसात रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. बाहयरुग्ण फी जास्त दिवस हातात ठेवणे ही बाब नियमबाहय आहे. याबाबत प्रत्येक लेखापरीक्षण अहवालांमध्ये आक्षेप नोंदविण्यात येतो, मात्र काहीही धोरणात्मक कार्यवाही होत नाही. ही बाब खेदजनक आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करुन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमाक २० :- ४ टक्के सादील खर्चाबाबत.**

पंचायत समिती, नांदगावकडील सन २००७-०८ या वित्तीय वर्षातील साधारणतः २० प्राथमिक शाळांकडील ४ टक्के सादील रोखवहीची पडताळणी केली असता बहुतांशी शाळेकडील जुने बँकेतील खाते हे जुन/जुलै २००७ मध्ये बंद करुन दुस-या बँकेत नवीन खाते उघडलेले आहे.

परंतु तपासणीस संबंधीतांनी जुन/जुलै २००७ अगोदरची रोकडवही व जुने बँकेचे पासबुक न आणल्याने जुन्या खात्यातील शिल्लक पुढे ओढल्याची तपासणी करता आली नाही. (उदा. प्राथमिक शाळा टाकळी बु।।, प्राथमिक शाळा भालुर)

याबाबत गटशिक्षणाधिकारी स्तरावरुन शाळांकडील रोखवह्यांची पडताळणी करुन कार्यवाही योग्य असल्याची खात्री करुन, तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेबाबत.**

पंचायत समिती, नांदगाव सन २००७ – २००८ च्या लेखापरीक्षणात शिक्षण व सामान्य प्रशासन विभागाकडील आस्थापना लेख्यांची तपासणी केली असता, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी कंत्राटी / मानधनावर लागलेल्या, परंतु १ नोव्हेंबर २००५ नंतर कायम केलेल्या;

या अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक ५(अ) मध्ये नमुद कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधी रक्कम कपात केलेली नाही. मात्र परिशिष्ट क्रमांक ५(ब) मध्ये कर्मचा-यांची परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजनेचे अशंदान कपात केलेली आहे.

तसेच या अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक ५ नुसार जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर कायम करण्यात आले त्यांचे अद्याप परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे अंशदान कपात केलेले नाही.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१.१०.२००५ व शासन निर्णय क्रमांक अंनियो १००७/१८/सेवा-४ दिनांक ७.७.२००७ अन्वये जे कर्मचारी १.११.२००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले, त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ लागू होत नाही. त्यामुळे परिशिष्ट क्रमांक ५ मधील कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये होणारी कपात ही चुकीची असून, त्यांना उपरोक्त शासन निर्णयानुसार स्तर १ लागु होतो. त्यात त्यांची मुळ वेतन अधिक महागाई वेतन अधिक महागाई भत्ता या एकूण रक्कमेच्या १०% रक्कम कपात करुन “ठेव” या शिर्षाखाली जमा करावयाची आहे.

२) जे कर्मचारी १.११.२००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले, त्यांच्याबाबत अद्यापही परिभाषित अशंदान निवृत्तीवेतन योजनेची रक्कम कपात करण्यात येत नसल्याने गंभीर स्वरुपाची आस्थापनाविषयक अनियमितता होत आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे परिशिष्ट क्रमांक ५(अ) व परिशिष्ट क्रमांक ५(ब) मधील दोन्हीही कर्मचा-यांची शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे अशंदान कपात करुन व विहीत निधीमध्ये भरणा करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २२ :- धनादेश रद्द न केल्याबाबत.</u>**

पंचायत समिती, नांदगांव येथील सन २००७-०८ चे लेखापरीक्षणामध्ये जिल्हानिधी, अभिकरण योजना निधी व जिल्हा परिषद उपकर रोकडवहयांची पडताळणी केली असता दिनांक ३१.३.२००८ अखेर अधिक काळ मुदतीचे धनादेश रद्द करण्यात आलेले नाहीत, असे आढळले.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ३१ प्रमाणे सहा महिन्यापेक्षा अधिक काळ न वटलेले धनादेश रदद करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे. अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक ६

नुसार अनुक्रमे जिल्हा निधी, अभिकरण योजना निधी व जिल्हा परिषद सेस निधी रोकडवही नुसार नमुद केलेले मुदतबाहय धनादेश रदद करण्यात आलेले नाहीत.

सदर धनादेश रदद करुन रक्कमाचा योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- वेतनपटावर मुद्रांकीत पोहच न घेतलेबाबत.**

पंचायत समिती, नांदगाव सन २००७ – २००८ मधील निवडक महिन्यांतील प्रमाणकांची पडताळणी केली असता, खालील उदाहरणादाखल नमुद प्रमाणकांमध्ये वेतन देयकावर सदर कर्मचा-यांची वेतन मिळालेबाबतची मुद्रांकीत पोहच घेतलेली नाही.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| १२ | १०.३.२००८ | ४ |
| १३ | १०.३.२००८ | ३० |
| १४ | १०.३.२००८ | ४ |
| १६ | १०.३.२००८ | १ |

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक डिडिओ-१००५/प्र.क्र.५/कोषा-प्रशा-५ दिनांक २९.८.२००५ मधील परिच्छेद क्रमांक ६ अन्वये वेतनपटावर स्वाक्षरी केल्याशिवाय बँकेतून (खात्यातून) रक्कम काढण्यात येऊ नये, असे नमुद असतांनाही पंचायत समितीतील कोणत्याही आस्थापनेने अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदरची बाब शासन निर्णयास धरुन नसल्याने आता पावेतोच्या सर्व मुद्रांकीत पोहोच घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २४ :- निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही अपूर्ण असणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील ३९ परिशिष्ट ४ मधील नियमान्वये पंचायत समितीत येणा-या प्रत्येक मागणी बिलाची व नोंदवहीची गट विकास अधिकारी याने प्रदान आदेशावर सही करण्यापूर्वी कनिष्ठ लेखा अधिका-यांकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

पंचायत समिती नांदगाव यांचेकडील गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयांतील निवृत्ती वेतन देयके, निवृत्ती वेतन लेखापरीक्षण नोंदवही (ए.पि.पि.९) मधील लेखा परीक्षा

नोंदवही व नमुना ए.पी.पी. १० मधील नोंदवही यांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अपूर्णता व त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

१. नमुना ए.पी.पी. ९ मधील लेखा परीक्षण नोंदवहीत निवृत्ती वेतनाचा प्रकार, निवृत्ती वेतन सुरु झाल्याचा दिनांक, अशंराशीकरण केलेली रक्कम व प्रदानाचा दिनांक, मुळ निवृत्ती वेतन, अशंराशीकरणानंतरची रक्कम, महागाई भत्त्याचे दर, मासिक एकत्रित निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे दर, निवृत्ती वेतनधारक मृत्यू पावल्यास मृत्यूची नोंद, वारसांची नोंद, प्रतयेक महिन्यांत किती निवृत्ती वेतन प्रदान केलेले याची नोंद व तपासणी केल्याबद्दल लेखाधिकारी यांची स्वाक्षरी, जिवीत प्रमाणपत्राची नोंद, पुनर्विवाहाची / पुनर्नियुक्तीची नोंद, वयांची ६५ वर्षे पूर्ण किंवा मृत्यूनंतर ७ वर्षे यांपैकी जे अगोदर घडले असेल इत्यादी संबंधिच्या तारखा, मृत्यूनंतरच्या जादा प्रदान केलेल्या रक्कमा बँकेकडून परत मागवून शासन सदरी भरणा केल्याबद्दलच्या चलनासह नोंदी, अशंराशीकरणानंतर १५ वर्षांनी पुनर्स्थापना केल्याबाबतच्या नोंदी, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत निवृत्ती वेतन आदेशाप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या नोंदी बँकेचे नाव व खाते क्रमांक इत्यादी नोंदी परिपूर्ण घेण्यांत आलेल्या नसल्यामुळे निवृत्ती वेतन धारकांस / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांस योग्य प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणांत परिपूर्ण पडताळणी करता आलेली नाही.

२. बँकेमार्फत निवृत्ती वेतन घेणा-या पेन्शन धारकास प्रत्येक वर्षी जीवन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जीवन प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्या पेन्शन धारकास निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे थांबवावे असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे तपासणी आढळून आलेले नाही.

३. नियम ८० अन्वये ज्या कुटूंब निवृत्ती वेतन धारकाचे निवृत्ती वेतन विवाहानंतर व पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांच्याकडून नमुना ए.पी.पी. १४ मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यांत येऊन ते डिसेंबर व जून मध्ये देय होणा-या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडण्यांत यावे असे प्रमाणपत्र देण्यात कसून झालेल्या प्रकरणांचे सविस्तर विवरण जानेवारी व जूलै महिन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचकडे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४. निवृत्ती वेतन आदेशांत निवृत्ती वेतन धारकांचे फोटो, स्वाक्षरीचे नमुने, सुधारीत निवृत्ती वेतनाचे आदेश इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कागदपत्रे नस्तीबंद केलेली नाहीत.

५. निवृत्ती वेतन बिल, निवृत्ती वेतन प्रदान आदेश व निवृत्त वेतन लेखा परीक्षा नोंदवहीतील नोंदी यामध्ये संदर्भिय नोंदवही क्रमांक, पृष्ठ क्रमांक यांची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भाकिंत लेखे तपासणीस लेखा परीक्षणात बराच कालावधी खर्च करावा लागत आहे.

सदरचे नमुना ए.पी.पी. ९ व इतर अभिलेखे वेळीच पूर्ण न केल्याने योग्य प्रदाने झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणांस करता आली नाही. या महत्त्वाच्या नोंदवह्या अपूर्ण

ठेवणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. तरी संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी व निवृत्ती वेतन लेखा परीक्षा नोंदवही व आदेश सर्व नोंदवहीसह अद्ययावत पुर्तता लेखापरीक्षणांस दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- लघुपाटबंधारे उपविभाग, नांदगांव यांचेकडील नोंदवही क्रमांक ४१ बाबत.**

लघुपाटबंधारे उपविभाग, नांदगांव यांचेकडील नमुना क्रमांक ४१ ची पडताळणी केली असता सदरच्या नोंदवहीतील पाझरतलाव यांचे संदर्भात संपादित / प्राप्त जमिनींचे ७/१२ उतारे उपलब्ध करुन त्या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या झालेल्या असल्याबाबत उपअभियंता (लघुपाटबंधारे) उप विभाग, नांदगांव यांनी प्रमाणित करुन, तसे अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- बांधकाम उपविभाग (इ.व द.) नोंदवहयाबाबत.**

१) नोंवही क्रमांक ३९:- मालमत्ता नोंदवहीत बांधलेल्या इमारतीच्या काही नोंदी घेतल्या असुन त्यातील रकाने ७ ते १३ अपूर्ण आहेत.
२) नमुना क्रमांक ४०:- मध्ये रस्त्याच्या नोंदी अद्ययावत असल्याची खात्री पटवावी.
३) नमुना क्रमांक ४१:- मध्ये रिकाम्या जागेच्या ठिकाणी ७/१२ उतारे प्राप्त करुन त्या जागेवर अतिक्रमण झालेले नसल्याने उपअभियंता, बांधकाम विभाग हयांनी प्रमाणित केलेले नाही.
४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ चे नियम ९८ अन्वये स्थावर मालमत्तेची पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र सक्षम कार्यालयाला कळविणेबाबत जा.क्र. व दिनांक असलेचे पत्रान्वये पाठविलेचे खात्री पटवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- अखर्चीत अनुदान शासनास परत पाठविलेबाबत.**

उप अभियंता, उप विभाग (ल.पा.) नांदगाव यांना सन २००६ – २००७ या वित्तीय वर्षात रुपये ७,७८,०००/- एवढे अनुदान ज.रो.यो. विहीरींसाठी प्राप्त झाले आहे. त्यापैकी या वित्तीय वर्षात रुपये ५,८७,९७२/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे व प्रमाणक क्रमांक ९४ दिनांक ३१.३.२००८ अन्वये रुपये १,९०,०२८/- एवढी रक्कम मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना परत केलेली आहे. तसेच सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक २(ब) नुसार अपूर्ण बांधकामांवर रक्कम रुपये २,८९,६९६/- खर्च करण्यात आलेला आहे व सदरची अपूर्ण कामे निधी उपलब्ध असतांनाही पूर्ण न करता निधी परत पाठविला आहे.

शासनाने ज्या उददेशाने अनुदान मंजूर केले ते अनुदान वित्तीय वर्षात विकास कामे पूर्ण होण्याचे दृष्टीने मंजूर केली जातात. उपरोक्त विभागाकडे ४ शाखा अभियंता व उप अभियंता १ अशी पदे कार्यरत आहेत, तसेच इतर कार्यालयातील ५ पदे, वाहन, वाहन चालक एवढे मनुष्यबळ व साधने उपलब्ध असूनही अनुदान खर्च न करणे व जनहिताची कामे न करणे ही बाब अतिशय अनियमित व गंभीर स्वरुपाची बाब आहे. अनुदान खर्च न करणे बाबत जिल्हा परिषद प्रशासनाने याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चीत करुन उचित प्रशासकीय कारवाई करावी.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- अनामत रक्कमा व्यपगत करणेबाबत.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २१९ नुसार देय असलेल्या रक्कमेची तीन वर्षात मागणी न केल्यास त्या व्यपगत करणे आवश्यक आहे. पंचायत समितीने विवरणपत्र क्र. ३(ब) अन्वये तीन वर्षापेक्षा जादा कालावधीच्या अनामत रक्कमा का व्यपगत केल्या नाहीत, याचे स्पष्टीकरण करण्यात यावे. सदर रक्कम रुपये ५३,०००/- व्यपगत करुन महसुल लेखाशिर्षाखाली जमा करुन, तसे अनुपालन लेखा परीक्षणांस दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २९ :- कृषि विभाग अपूर्ण विहिरींबाबत**

सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक २(अ) नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर विशेष घटक योजनेंतर्गत १७ विहिरींची कामे अपूर्ण असुन त्या कामांवर रक्कम रुपये ३,६१,४६६/- खर्च करण्यात आलेला आहे व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी

उपयोजना (ओटीएसपी) अंतर्गत ७ विहिरींचे काम अपूर्ण असुन त्या कामाांर रक्कम रुपये १,६२,५४१/- खर्च करण्यात आलेला आहे.

सदर खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सन २००७-०८ वर्षात कृषि विभागांतर्गत प्राप्त अनुदानाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव | प्राप्त अनुदान | खर्च अनुदान | अखर्चित अनुदान |
|---|---|---|---|---|
| १ | ओटीएसपी | ५,१६,१३१ | ४,२६,६६३ | ८९,४६८ |
| २ | विघयो (एससीपी) | ६,१५,३११ | ६,१५,३११ | -- |
| | एकूण | ११,३१,४४२ | १०,४१,९७४ | ८९,४६८ |

ओटीएसपी अंतर्गत ७ विहिरींचे कामे अपूर्ण असतांना सन २०७-०८ वर्षात रक्कम रुपये ८९,४६८ इतके अनुदान शासनास परत केलेले आहे. ही विसंगती असल्याने नियोजनाचा अभाव दिसून येतो. या विहिरी अपूर्ण ठेवण्यात लाभार्थी जबाबदार असतील तर त्यांचेवर विहित दंडनीय कार्यवाही अथवा प्रशासनातील कर्मचारी जबाबदार असतील तर त्यांचेवर अनुदान अखर्चित ठेवण्याबद्दल उचित प्रशासकीय कार्यवाही करावी.

२) अखर्चित रक्कम शासन सदरी भरणा करण्याऐवजी प्रमाणक क्रमांक ६२ दिनांक २९.३.०८ अन्वये रक्कम रुपये ८९,४६८/-, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक यांचेकडे पाठविली आहे. हे अखर्चित अनुदान विहित मुदतीत शासनास परत गेल्याची खात्री पटवावी.

३) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग आदेश क्रमांक नाशिक जाविका १२९८/प्र.क्र.१०४/ रोहयो/१० दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहिरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासुन दोन महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्याचे आत पूर्ण करावयाचे असतांना याप्रकरणी शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही. यातुन प्रशासनाची अकार्यक्षमता स्पष्ट होते.

४) अपूर्ण विहिरीवर शासकीय अनुदान रक्कम रुपये १०,४१,९७४ खर्च होऊन सुध्दा योजनेचा हेतु सफल होत नाही. नविन विहिरींच्या कामांना मंजुरी देणेपूर्वी अपूर्ण विहिरी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

उपरोक्त नमुद आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

लेखाशिर्ष

११ कृषी

आक्षेपाधिन रक्कम रुपये १०,४१,९७४/-

**परिच्छेद क्रमांक ३० :- अपूर्ण जवाहर विहीरीबाबत. (लघुपाटबंधारे)**

पंचायत समिती, नांदगांव अधिनस्त लघुपाटबंधारे उपविभागाकडील दि. ३१.३.२००८ अखेरपर्यंत ९ जवाहर विहीरीची सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक २ (ब) मध्ये नमुद केल्याप्रमाणे कामे अपूर्ण असून त्यांवर रुपये २,८९,६९६/- खर्च करण्यांत आलेला आहे.

१) सन २००३ – २००४ पासून २००६ – २००७ अखेर पावेतो ९ विहीरींची कामे अपूर्ण असून ही अतिशय गंभीर स्वरुपाची बाब आहे. या अपूर्ण कामांवर रक्कम रुपये २,८९,६९६/- अनुदान खर्च होऊन सुध्दा योजनेचा लाभविषयक मुळ उद्देश सफल होत नाही.

याबाबत मागील अहवाल सन २००६ – २००७ मध्ये क्र. १३ नुसार आक्षेप घेऊनही काहीही कार्यवाही केलेली नाही. तरी याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन उचित कारवाई व्हावी. लाभार्थ्यांकडून विहीत मुदतीत पूर्ण न झालेल्या कालावधीपासून अवर सचिव, नियोजन विभाग, मुंबई यांचे आदेश क्र. ६५ दिनांक १३.९.२००१ अन्वये १८% दराने व्याज आकरणी करुन दंड वसूल करण्यांत यावा.

२) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग आदेश क्र. नाशिक / जाविका-१२९८ /प्र.क्र.१०४ /रोहयो-१० दिनांक १.७.१९९८ मधिल परिच्छेद क्र. १७ व १८ नुसार विहीरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून दोन महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्यांचे आत काम पूर्ण करावयाचे असतांना, वरील प्रकरणी या शासन आदेशाचे पालन झालेले नाही.

३) वरीलप्रमाणे ९ विहीरी अपूर्ण असतांना सन २००६-०७ वर्षांत रुपये १,९०,०२८/- इतके अनुदान शासनास परत पाठवले आहे. याबाबत सक्षम अधिका-याचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

४) सोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमुद केल्याप्रमाणे श्री.शिवाजी शंकर पाटील (पिंप्राळे) व श्रीमती. बेबीबाई व्यंकट पवार (वाखारी) यांचे लाभ रदद केलेले आहेत. याबाबत सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे.

पंचायत समिती, नांदगांव

---

**परिच्छेद क्रमांक ३१ :- वार्षिक लेखे.**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे संपूर्ण पूर्ततेस अधिन राहून व निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांतील जमा खर्चामध्ये कुठलीही गंभीर अनियमितता अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेली नाही, याआधारे पंचायत समितीचे सन २००७ – २००८ चे लेखे बरोबर आढळून आले आहेत, असे नमुद करण्यात येत आहे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ३२ :- आक्षेप विवरणपत्र.</u>**

लेखापरीक्षणात आढळून आलेल्या किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पूर्तता लेखा परीक्षण कालावधीत करुन घेतल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमित करण्यात आलेले नाही.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ३३ :- अनुपालन व पोहच</u>**

या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांचे अनुपालन, मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) अन्वये अहवाल प्राप्त झाले पासुन चार महिनेच्या आत, पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतीसह तीन प्रतीत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविणेत यावे. तसेच हा अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवुन पोहोच देणेत यावी.

(वि.ए.कोते)
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**<u>प्रत सविनय सादर-</u>**

१) मा. सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई ( पत्राने )
२) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई
३) मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिकरोड
४) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
५) मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक .

**<u>प्रत सस्नेह अग्रेषित :-</u>**

१) म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती ), स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई

२) म. गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी), पंचायत समिती, नांदगांव, जि. नाशिक

उपमुख्य लेखा परीक्षक

स्थानिक निधी लेखा, नाशिक